# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी ठाणे यांचे कार्यालय

(रेतीगट शाखा)

**४ था मजला, कोर्ट नाका, ठाणे (प.) – ४००६०१**

**दुरध्वनी क्र.०२२-२५३४३६३६ ई-मेल – retigat.thane@gmail.com**

---

## ई-निविदेसह ई-लिलाव सूचना

**सन २०१७-१८ करीता दिनांक ३० जून, २०१८ पर्यंतच्या मुदतीसाठी रेती/वाळू व्दितीय फेरलिलाव.**

**यांत्रिक साधनाद्वारे वाळू / रेती उत्खननासाठी राखीव गटांकरीता दिनांक ३० जून, २०१८ पर्यंतच्या मुदतीसाठी ई निविदासह ई-लिलाव (सन २०१७-१८)**

**सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २१ मे, २०१५ अन्वये निश्चित केलेले धोरण**

ठाणे जिल्ह्यातील ठाणे व कल्याण या तालुक्यातील खाडीमधील यांत्रिक साधनांद्वारे रेती उत्खननासाठी राखीव असलेल्या सोबतचे प्रपत्र-अ मध्ये नमुद केलेल्या ३ रेतीगटांच्या (१२ रेती उपगटांच्या) निर्गतीसाठी ई-निविदेसह "व्दितीय फेरलिलावासाठी" ई- लिलाव पध्दतीचा अवलंब करण्यात येणार असून, सदर प्रक्रिया सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती निर्गती धोरण दिनांक २१ मे, २०१५ अन्वये महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण यांचेकडील सी.आर.झेड. विषयक अनुमती, शासन पर्यावरण विभागाकडील पर्यावरण विषयक अनुमती व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडील प्राधिकार पत्र ममेबो/मुकाअ/जआ/टी-९७x/यांत्रिक उत्खनन/ ठाणे/ २०१७-१८/८०२ दि.०४.०९.२०१७ व पत्र दि.१८/१०/२०१७ तसेच सर्व्हेक्षण अहवालामधील अटी व शर्तीस अधिन राहून राबविण्यात येणार आहे.

१. ई-निविदेसह ई-लिलाव प्रक्रियेसाठी ICICI बँक व ABC Procure ,अहमदाबाद यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

२. या लिलावाच्या प्रक्रियेसंबंधी सर्व माहिती, वाळू/रेती उत्खननासंबंधी अटी व शर्ती यांची सविस्तर माहिती https://thaneco.abcprocure.com या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

३. या लिलाव प्रक्रियेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | दिनांक | वेळ | प्रक्रिया |
|---|---|---|---|
| १ | २१.११.२०१७ | सकाळी १०.०० पासून | प्रक्रियेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींचे/संस्थेचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन व ई-निविदा भरणे सुरु होईल. |
| २ | २९.११.२०१७ | सायं. ५.०० | ऑनलाईन रजिस्ट्रेशन बंद होईल. |
| ३ | ०४.१२.२०१७ | सायं. ५.०० | ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने स्विकारणे बंद होईल. |
| ४ | ०६.१२.२०१७ | सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत | ई-लिलाव प्रक्रिया सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत. वेळ समाप्तीच्या वेळी बोली आल्यास संगणकीय प्रणालीव्दारे प्रत्येकी १० मिनीट प्रमाणे ३ (तीन) वेळा वाढ करण्यात येईल. |
| ५ | ०६.१२.२०१७ | - | उक्त लिलावाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर ई-निविदा डाऊनलोड करुन उघडण्यात येईल व ई-निवीदा/ई-लिलाव यातील उच्चतम बोली निश्चित करण्यात येईल. |

४. सदर रेती उपगटाची ई-निविदेसह ई-लिलाव व प्रथम फेरलिलाव प्रक्रिया आयोजित करण्यात आली होती. तथापि विहीत मुदतीत सदर रेती उपगटासाठी एकाही व्यक्ती/संस्थेने ई-निविदा ऑनलाईन पद्धतीने भरणा केलेली नाही. त्यामुळे दिनांक २१/०५/२०१५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार या रेतीगटांचा "व्दितीय फेरलिलाव" करण्याचे निश्चित करणेत आलेले आहे.

५. लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी मागील ३ वर्षांची आयकर विवरणपत्रे(आर्थिक वर्ष सन २०१४-१५,२०१५-१६ व २०१६-१७), पॅन कार्ड, आधार कार्ड, टॅन कार्ड (कंपनी असल्यास) व निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

६. ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

७. ई-निविदेसह ई-लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यास प्रत्येक रेती उपगटासाठी पुढीलप्रमाणे ना परतावा फी ऑनलाईन पध्दतीने अदा कराव्या लागतील .

i. नोंदणी फी फक्त एकदाच रु.२९५०/-

ii. फॉर्म फी प्रत्येक वाळू उपगटाकरीता स्वतंत्र रु. २०००/- (१० लाखांपर्यंत अपसेट प्राईस असलेल्या वाळू उपगटाकरीता) व रु. ५०००/- (१० लाखांपेक्षा जास्त अपसेट प्राईस असलेल्या वाळू उपगटाकरीता).

iii. प्रक्रिया फी (प्रत्येक वाळू उपगटाकरीता स्वतंत्र) रु. १५९३/-

८. लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीला प्रत्येक रेती उपगटासाठी प्रपत्र "अ" च्या रकाना १० मध्ये नमुद केलेली रक्कम अनामत रक्कम म्हणून ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल.

९. ई-निविदा व ई-लिलावाच्या प्रक्रियेबाबत दिनांक २२-११-२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता रेतीगट शाखा, ४ था मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहे. इच्छुक व्यक्तींना या प्रशिक्षणासाठी उपस्थित राहता येईल. ज्या व्यक्तींना या प्रशिक्षणासाठी उपस्थित राहणे शक्य नसेल त्यांना https://thaneco.abcprocure.com या संकेतस्थळावर याबाबतचे सादरीकरण (प्रात्यक्षिक) पाहता येईल.

१०. ई-निविदा व ई-लिलावाबाबत कोणत्याही अडचणी असल्यास ०७९४००१६८६६/ ०७९४००१६८११/०७९४०२७०५९६ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

क्र. रेतीगट/गौ.ख./रेती लिलाव/२०१७-१८/ कावि-236/२०१७
स्थळ : रेतीगट शाखा, ४ था मजला,
जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे
दिनांक : २१.११.२०१७

18/11/17

(अनिल पवार)
अपर जिल्हाधिकारी ठाणे